
MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



किंमत ३ रु । पाने ४
PRICE - 3 RUPEES PAGES - 4

**मनोज जरांगे यांचे ४ जून पासून पुन्हा उपोषण:मराठ्यांमुळे मोदी गोधड्या टाकूनच महाराष्ट्रात, जरांगेंचा हल्ला; ८ जूनला नारायण गडावर सभा**



बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -२३२ मंगळवार दि.१४ मे २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -232 TUESDAY DT. 14 MAY 2024 RNI : MAHMAR/2023/83965

# गोल्डन कंट्रक्शनचा अफसर नगरपरिषद लुटून खाऊ लागला..?





- नीता अंधारेसह काही मोजक्या नगरसेवकांना टक्केवारी मिंद करण्याचे काम अप्सर कडून.?
- शेख अफसर गोल्डन कंट्रक्शनचा मालकाच्या घराबाहेर पाणीपुरवठा कर्मचारी बसून.
- नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी कोट्यावधी रुपयाची गुत्तेदारांची बिल काढण्यासाठी पैसे आहेत.
- पण कंत्राटी कर्मचारी पाणीपुरवठा यांना आठ आठ महिन्यापासून पगार नाही.
- अठरा हजार रुपयांनी अप्सर नावाचा गुत्तेदार पेमेंट उचलतो आणि कर्मचाऱ्यांच्या हातावर आठ हजार रुपये देतो.
- अफसरच्या दारात आठ महिन्यापासून लोक चकरा मारत आहेत अफसर म्हणतो मुख्याधिकारी नीता अंधारेच्या दारात जाऊन बसा
- शेख अफसर गोल्डन कंट्रक्शन चा मालक
- गोल्डन कंट्रक्शन च्या शेख अप्सर बीड नगर परिषदेत सोबत केलेल्या करारनाम्याचा बॉण्ड प्रमाणे कर्मचाऱ्यांना पेमेंट द्यावे.
- शेख अफसर म्हणतो नगरपरिषद च्या मुख्याधिकारी नीता अंधारे ह्या मला पैसे देत नाहीत मी कुठून तुम्हाला देऊ
- बीड नगरपरिषद आंधळा दळतय कुत्र पीठ खातय नगरपरिषद लुटून खाण्याचे काम नीता अंधारे यांच्याकडून?
- नगर परिषद च्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी शेख अप्सरचे कान उघडणे ऐवजी त्याची पाठ राखण करण्यातच व्यस्त.
- कित्येक महिन्यापासून कर्मचारी पगारापासून वंचित नीता अंधारण कडे मागणी केली तर अप्सर कडे जा आणि अप्सर कडे केली तर नीता अंधारांकडे जा तुटपुंजा पगारावर बीडकरांना पाणी पाजणाऱ्याचे बेहाल

बीड /प्रतिनिधी

बीड नगर परिषदेमध्ये सध्याची परिस्थिती पाहता बीड नगर परिषदेच्या वतीने बीड शहरासह अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा असेल किंवा अन्य भागातील स्वच्छतेचे प्रश्न असतील वेगवेगळ्या टेंडर मध्ये कोट्यावधी रुपयांचे भ्रष्टाचार करून नगरसेवकांच्या घशात घालण्याचे काम यावेळी मुख्याधिकारी नीता अंधारे ह्या करत आहेत पाणीपुरवठ्याचे बीड शहरातील कंत्राटी कर्मचारी एकूण संख्या ६० ते ७० जणांची असले ने बीड शहरासह काडीवडगाव येथील प्लांट असेल किंवा इट येथील पाणीपुरवठ्याचा प्लांट असेल बीड शहरातील नगर रोड बार्शी नाका खंडेश्वरी पालवण चौक अंकुश नगर सह अनेक भागांमध्ये कंत्राटी कर्मचारी हे बीड शहराला पाणी पाजण्याचं काम करत आहेत सध्या उन्हाळ्याची परिस्थिती जाणवत असताना सुद्धा हेच कर्मचारी दीड करांना पाणीपुरवठा करत आहेत याच पाणीपुरवठ्यातील कंत्राटी कर्मचारी यांच्या पगारात ह्या गेल्या आठ महिन्यापासून झालेल्या नाहीत गोल्डन कंट्रक्शन चा मालक शेख आपसर यांनी संबंधित काळात केलेला असताना याला पाठीशी घालण्याचे काम बीड नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी नेता आमदार ह्या करत आहेत बीड नगरपरिषद अंतर्गत १८ हजार रुपये २० हजार रुपये हमहिन्याने शेख अफसर याने संबंधित टेंडर घेतले आहे या टेंडरचा बॉण्ड करत असताना त्या बोंडमध्ये असा उल्लेख करण्यात आलेला आहे की संबंधित बोर्ड मध्ये बीड नगरपरिषद अंतर्गत मला पेमेंट आले तरी आणि नाही आले तरी मी माझ्या जवळचे व खिशातील पेमेंट करून नगर परिषदेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना महिन्याच्या तारखेच्या ठरलेल्या प्रमाणे मी पगार अदा करेल परंतु शेख अफसर म्हणतो की मला नगरपरिषद मधून नीता अंधारे ह्या मला पगार देत नाही तर मी कुठून तुम्हाला पगार देऊ यावेळी शेख अफसर याने मात्र खरच घातला आहे गेल्या आठ महिन्यापासून शेख अफसर याने मला पैसे आले नाहीत मी तुम्हाला पगार देणार नाही तुम्ही इथं आमदार यांच्याकडून पगार घ्या आणि मला १८००० रुपये येतात तर मला यामध्ये मुख्याधिकारी निता अंधारे सह नगरसेवक यांना टक्केवारी द्यावी लागते असं सांगत आहे. असे अप्सर याने या लोकांचे पगारी दिल्या नाहीत. तर बीडचा पाणीपुरवठा ठप्प होईल गेल्या आठ महिन्यापासून ही लोक पगारांपासून वंचित आहेत. म्हणून शेख अप्सर गोल्डन कंट्रक्शन चा मालक याला मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी पगार देण्यासाठी आदेशित करावे अशी मागणी बीड नगर परिषदेतील कंत्राटी कर्मचारी यांनी केलेली आहे. यावेळी नितीन बागलाने भाऊसाहेब तांबे अन्वर शेख धीरज जानवे मिलिंद ठोकर लहू गायकवाड विजय विद्यालय कर्मचाऱ्यांनी असे कापसाच्या दारासमोर ठिय्या मांडला आहे सध्या ते कापसाच्या दारामध्ये बसून आहेत परंतु शेख घराच्या बाहेर निघायला तयार नाही आणि फोनही उचलायला तयार नाही यावेळी बीड नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी व अभियंता पाणीपुरवठा माने यांच्या कडे लेखी तक्रार निवेदन यावेळी या अगोदर सुद्धा अनेक दिलेले असताना याकडे मुख्याधिकारी नगरपरिषद निता अंधारे ह्या मुद्दामून अर्थपूर्ण दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप यावेळी पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

विद्यमान आमदार संदीप भैया शिरसागर यांनी शेख अफसर व नीता अंधारे यांच्यावरती कारवाईची मागणी करावी व पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी यावेळी पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

बीड विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष डॉक्टर योगेश शिरसागर यांनी तर सत्तेमध्ये असताना सुद्धा बीड नगर परिषदेकडे दुर्लक्ष केलेला आहे डॉक्टर योगेश शिरसागर यांनी गोल्डन कंट्रक्शन चा मालक शेख अफसर व शिव अनिता आमदार यांना विचारणा करून शासनापर्यंत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या पर्यंत बीड नगर परिषदेचे अनेक प्रश्न प्रलंबित असताना घेऊन जाणे ही काळाची गरज असताना सुद्धा परंतु या ठिकाणी योग्य क्षीरसागर हे प्रचारात व आपण हे केलं आपण ते केलं असे सांगण्यातच व्यस्त आहेत नीता अंधारे या योगेश शिरसागर यांचा ऐकत नसल्याची चर्चा बीड शहरांमध्ये लागले आहेत

# राज्यात निवडणूक प्रचारात जुमलेबाजीची 'दीवार'



मुंबई : राज्यात २० मे रोजी लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि अंतिम टप्प्याचं मतदान होणार आहे. यामध्ये मुंबईतील सर्व ६ जागांचा समावेश असून याकरता आता मुंबईत प्रचारानं जोर धरलाय. पाचव्या टप्प्याच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या सभा तर महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी कल्याणमध्ये पंतप्रधान मोदी यांचा रोड शो होत आहे. यादरम्यानच आता 'दीवार' या चित्रपटातील डायलॉगच्या आडून सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांना इशारा देत असल्याचं बघायला मिळतंय.

चित्रपटातील डायलॉग्सचा प्रचारात वापर : २०१४ साली लोकसभा निवडणुकीत भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्यावर सिंचन घोटाळ्याप्रकरणी निशाणा साधला होता. आमचं सरकार आल्यानंतर अजितदादा चक्की पिसिंग.. पिसिंग अँड चक्की पिसिंग, असं ते म्हणाले होते. त्यानंतर आता काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी एका प्रचारसभेत 'बाजार समितीत कोणी भ्रष्टाचार केला असेल तर चक्की पिसिंग अँड पिसिंग' असा इशारा निलेश लंके यांना दिला होता. तसंच बारामतीत मतदानाच्या दिवशी 'मेरे पास मेरी माँ है' असं विधान अजित पवारांनी केलं होतं. तर ठाणे येथील सभेतून ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी महायुतीच्या उमेदवाराविरोधात टीका करताना 'मेरा बाप गद्दार है' असं तुमच्या कपाळवार लिहिलंय असं म्हणाल्या होत्या.तू किस झाड की पत्ती : अहमदनगर लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके आणि महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्यात लढत होत आहे. सुजय विखे यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची अहमदनगरमध्ये सभा पार पडली. सभेदरम्यान अजित पवार यांनी निलेश लंके यांच्यावर जोरदार टीका केली. महाराष्ट्रात माझ्या नादी लागणाऱ्यांचा बंदोबस्त बरोबर केला असून तू किस झाड की पत्ती है. सगळ्या ठिकाणी तुला अजित पवार दिसेल, असं म्हणत त्यांनी निलेश लंके यांना इशारा दिला.तुम क्या जानो एक ईडी की नोटीस की कीमत : ठाकरे गटाचे खासदार आदित्य ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारादरम्यान 'ओम शांती ओम' या चित्रपटातील डायलॉगचा आधार घेत सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला.

# बीडमध्ये बोगस मतदान

## अनेक ठिकाणी फेरमतदान घेण्याची बजरंग सोनवणेंची मागणी?

बीड ।प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मोठ्या प्रमाणात झालेलं जातीय ध्रुवीकरण, भाजपाच्या पंकजा मुंडे विरुद्ध शरद पवार गटाचे बजरंग सोनावणे अशी झालेली लढत यामुळे यंदाच्या लोकसभा निवडणुकीत बीड लोकसभा मतदारसंघाकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलेलं आहे. दरम्यान, सोमवारी बीडमधील मतदान प्रक्रिया आटोपल्यानंतर बजरंग सोनावणे यांनी गंभीर आरोप केला आहे. बीडमधील काही मतदान केंद्रांवर मोठ्या प्रमाणात बोगस मतदान झालं असून, या मतदान केंद्रांवर फेरमतदान घेण्यात, यावे अशी मागणी बजरंग सोनावणे यांनी केली आहे.

पंकजा मुंडे यांच्या विरोधात निवडणूक लढवत असलेले शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनावणे यांनी बीडमधील काही मतदान केंद्रांवर फेर मतदान घेण्याची मागणी केली आहे. बीडमधील काही मतदान केंद्रांवर बोगस मतदान झाल्याची तक्रार बजरंग सोनावणे यांनी मुख्य निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली आहे. परळी, केज, पाटोदा, आष्टी आणि धारूरमध्ये फेरमतदान घेण्यात यावं, अशी मागणी बजरंग सोनावणे यांनी केली आहे. धर्मपुरी गावामध्ये काही मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोपही सोनावणे यांनी केला आहे.



भाजपाने बीडमधून पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिल्यानंतर अजित पवार गटात असलेल्या बजरंग सोनावणे यांनी शरद पवार गटात जात उमेवारी मिळवली होती. तत्पूर्वी २०१९ मध्येही बजरंग सोनावणे यांनी पंकजा मुंडे यांच्या बहिण डॉ प्रितमताई मुंडे यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. त्यावेळी त्यांचा पराभव झाला होता. त्यामुळे निकालाबाबत उत्सुकता निर्माण झालेली आहे.

## घाऊक महागाईने १३ महिन्यांतील उच्चांक गाठला


नवी दिल्ली / प्रतिनिधी

एप्रिल महिन्यात घाऊक महागाई १.२६ टक्क्यांवर पोहोचली आहे. महागाईचा हा १३ महिन्यांचा उच्चांक आहे. यापूर्वी मार्च २०२३ मध्ये घाऊक महागाई दर १.३४% होता. खाद्यपदार्थांच्या किमती वाढल्याने महागाई वाढली आहे. तर एक महिना आधी मार्च २०२४ मध्ये तो ०.५३ टक्के होता. तर घाऊक महागाई फेब्रुवारीमध्ये ०.२०% आणि जानेवारीत ०.२७% होती.यापूर्वी एप्रिलमध्ये किरकोळ महागाई दर ११ महिन्यांतील सर्वात कमी होता. एप्रिलमध्ये किरकोळ महागाई दर ४.८३ टक्क्यांवर आला आहे. जून २०२३ मध्ये ते ४.८१% होते. एप्रिल महिन्यात मात्र खाद्यपदार्थ महाग झाले आहेत. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने सोमवारी १४ मे रोजी ही आकडेवारी जाहीर केली.

# मेट्रोपॉलिटन ऑफ बिलिव्हर्स ईस्टर्न चर्च, मोरन मोर अथनेसियस योहान यांचे बुधवारी संध्याकाळी निधन झाले

करोडो लोकांपर्यंत सुवर्ता पत्रिका रेडिओ या माध्यमातून सुसमाचार पोहोचवणारे लाखो सेवकांचे मार्गदर्शक. हजारो चर्चची स्थापना करणारे ,गॉस्पल फॉर एशिया हे विजन घेऊन आशाया खंडामध्ये सेवा पोहोचवणारे ज्यांना डॉ. के,पी योहानान म्हणून वाचक ओळखणारे आमचे आदरणीय मेट्रोपॉलिटन,

प्रभू येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेसह जतन न झालेल्या लोकांपर्यंत पोहोचण्याच्या त्याच्या समर्पण आणि अतुलनीय बिशप डॉ. के पी योहानन हे या ग्रहावरील सर्वात उल्लेखनीय पुरुषांपैकी एक होते- देवाने या महान सेवकाच्या तोंडाचा उपयोग जगभरातील लाखो आत्म्यांसमोर त्याचे सत्य घोषित करण्यासाठी केला. ते लाखो लोकांसाठी एक प्रेरणा होते आणि त्याच्या जीवनाचा आणि सेवेचा संपूर्ण प्रभाव अनंतकाळच्या या बाजूने समजला किंवा मोजला जाऊ शकत नाही. त्यानी संपूर्ण जगाला आपले कुटुंब बनवले. बिशप डॉ. के पी योहानन इतिहासात खाली जातील आणि आपल्या हृदयात जिवंत राहतील, आपल्यापैकी जे ॠक्ष-/ बिलीव्हर्स ईस्टर्न चर्च समुदायाच्या पूर्वीच्या मंत्रालयाचा भाग आहेत त्यांना त्यांच्या जीवनाने आणि मंत्रालयाने विशेष आशीर्वाद दिला आहे. शतकाच्या चांगल्या भागासाठी, त्याचा आवाज संदेश जगभरातील हजारो लोकांना आशा देणारा आहे. ते लोकप्रिय आणि राजकारण्यांमध्ये वावरले परंतु त्यांनी कधीही सामान्य स्पर्श गमावला नाही. त्यांनी लाखो लोकांना उपदेश केला पण स्वतःची नम्रता कधीही गमावली नाही. त्याला श्रीमंत आणि सामर्थ्यवान लोकांपर्यंत पोहोचण्याचा आनंद मिळत असे परंतु तो विनम्रपणे जगले. बिशप डॉ. के पी योहानन हे एक



धर्मोपदेशक म्हणून साधे आणि प्रगल्भ होते. त्यांनी बांधलेले मंत्रालय, त्यांनी उभे केलेले हजारो नेते आणि पुस्तके आणि त्यांनी निर्माण केलेल्या प्रशिक्षण साधनांमधून त्यांचा वारसा पुढे चालू राहील. कुटुंबाला मनापासून शोक. देव कुटुंबातील सर्व सदस्यांना शांती आणि सांत्वन देवो. बिशप डॉ. के पी योहानन यांनी त्यांच्या स्वतःच्या शब्दात त्यांचा उद्देश असे वर्णन केले की मी या पृथ्वीवर कायमचा नाही हे जाणून मला माझे उर्वरित आयुष्य जगायचे आहे. विसरण्यासाठी आपण कितीही प्रयत्न करत असलो तरी, मृत्यू ही एक खरी वस्तुस्थिती आहे. विश्वासणारे म्हणून, आशा बाळगूया कि आपण त्यांना भेटणार. कारण मला तर जगणे हे ख्रिस्त आणि मरणे हा लाभ आहे.



**गेवराईचे ज्येष्ठ पत्रकार काझी अमान यांच्या निवासस्थानी मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी दुपारी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी तालुक्याचे पहिले जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांच्याशी विविध विषयावर चर्चा करताना जरांगे पाटील व सोबत माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे हे दिसत आहेत.**




**शिवसंग्राम बीड शहर अध्यक्षपदी सुहास पाटील यांची नियुक्ती करण्यात आली या वेळी शिवसंग्राम राष्ट्रीय अध्यक्षा डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी त्यांचा सत्कार केला.**

# अपंग निराधार महिलेला कुटीर रुग्णालय नेकनूर मार्फत मिळाली मोफत नवदृष्टी

बीड जिल्ह्यात आरोग्य सुविधा पुरवण्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या कुटीर रुग्णालय नेकनुर येथे एक खूप चांगला उपक्रम पहावयास मिळाला.कुटिर रुग्णालय नेकनूर येथे दर रविवारी व गुरुवारी नेत्र तपासणी केली जाते त्यामधून मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करून मोफत शस्त्रक्रियेसाठी बीड जिल्हा रुग्णालय येथे नेले जाते.

काल गुरुवार दिनांक ९ /५ / २०२४ रोजी एक निराधार अपंग महिलेची तपासणी करून दोन्ही डोळ्यांना मोतीबिंदू असताना शस्त्रक्रियेसाठी जिल्हा रुग्णालय बीड येथे नेऊन शस्त्रक्रिया करण्यात आली. ही महिला अपंग असल्याकारणाने तिला इतर खाजगी दवाखान्यांमध्ये खर्च करण्याची ऐपत नव्हती व अपंग असल्यामुळे कोणी ऑपरेशन साठी घेतही नव्हते.कुटिर रुग्णालय नेकनुर येथील वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर हुबेकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती सुप्रिया गोपाळघरे नेत्रचिकित्सा अधिकारी यांनी जिल्हा रुग्णालय बीड येथे नेऊन ताबडतोब पेशंटला ऍडमिट करून डॉ. राधेश्याम जाजू नेत्रशल्यचिकित्सक यांनी सदरील अपंग महिलेवर व्यवस्थित शस्त्रक्रिया केली आज ती अपंग महिला दृष्टी मिळाल्याने एकदम खुश आहे जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर बडे साहेब, डॉक्टर एल आर तांदळे साहेब,जिल्हा नेत्रशल्यचिकित्सक डॉक्टर इरफान शेख तसेच वैद्यकीय अधिक्षक डॉक्टर हुबेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कुटिर रुग्णालय नेकनूर चे नेत्र विभागाचे काम वाखणण्या जोगे आहे.

तरी नेकनूर व परिसरातील डोळ्यांच्या रुग्णांनी कुटीर रुग्णालय नेकनूर येथे येऊन नेत्र तपासणी व




मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा लाभ घ्यावा..!

# जंगम समाजातील युवकांनी रुद्र शिबिरात सहभागी व्हावे... राष्ट्रीय जंगम समाज संघटना प्रमुख श्रावण जंगम

मुक्रमाबाद/प्रतिनिधी

श्री गणाचार्य प्रतिष्ठान व श्री वीरमाहेश्वर जंगम समाज, मुखेडच्या वतीने गणाचार्य मठ संस्थान येथे दि. १४ मे ते १४ जूनदरम्यान जंगम समाजातील विद्यार्थ्यांसाठी श्री रूद्र शिबिर आयोजित करण्यात आले आहे. गणाचार्य मठ संस्थान येथे सामाजिक बांधिलकीतून अनेक उपक्रम राबविले जातात. व्याख्यानमाला, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, सामूहिक विवाह सोहळा, सार्वजनिक वाचनालय, रक्तदान शिबिर, योग शिबिरासह धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात. यातून सामजिक प्रबोधन करण्यात येते. भजन, कीर्तन, प्रवचन, शिवनाम सप्ताह ही होतात. जंगम समाजातील विद्यार्थ्यांवर सुसंस्कार व्हावेत, धार्मिक विधी शास्त्रोक्त पध्दती माहिती व्हावी म्हणून गत १० वर्षांपासून हे कार्यक्रम

होत आहेत. रुद्र शिबिरात दररोज सकाळी आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे ५ दिवसाचे योग शिबिर. अनुभवी शास्त्री गणांचे मार्गदर्शन, राहणे स जेवण्याची मोफत व्यवस्था, श्रीरुद्र, पुजाविधी व पंचांग शिकवले जाणार आहे. यात श्री ष.ब्र.प. १०८ डॉ. वीरुपाक्ष शिवाचार्य महाराज मठाधिपती गणाचार्य मठसंस्थान मुखेड जि. नांदेड यांचे मार्गदर्शन लाभणार आहे



तर विश्वनाथ मठपती (श्रीशैलम) श्री विवेकानंद स्वामी (लातूर), शुभम स्वामी (फुलवळ) हे शिबिरात सर्व माहिती देणार आहेत. जंगम समाजातील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा यासाठी श्री.ष.ब्र.प.१०८ डॉ. वीरुपाक्ष शिवाचार्य महाराज, श्री नागनाथ स्वामी, संदीप पोफळे यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन मठ संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.




**शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी बीड लोकसभा मतदारसंघ निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क गेवराई तालुक्यातील दैठण या मूळ गावी बजावला**



**बीड: सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी कुटुंबासह मतदानाचा हक्क बजावला.**

# अडवाणी,मुरली मनोहर जोशी प्रमाणे नरेंद्र मोदींनाही ७५ वर्षानंतर राजकारणातून निवृत्त करणार का ?

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाने ७५ वर्ष वय झालेल्यांना सक्रीय राजकारणातून बाजूला केले आहे. भाजपा पक्ष संघटन मजबूत करणारे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांनाही ७५ वर्ष वयाचे कारण देऊन राजकारणातून बाजूला केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही याच नियमानुसार ७५ वर्ष झाल्यानंतर राजकारणातून निवृत्त करून अमित शाह यांना पंतप्रधान करणार का ? या प्रश्नाचे उत्तर भारतीय जनता पक्षाने द्यावे, अशी मागणी काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केली आहे.

टिळक भवन इथं पत्रकार परिषदेला संबोधित करताना रमेश चेन्नीथला यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या भाषणात हिंदू-मुस्लीम, पाकिस्तान हे मुद्दे घेऊन धार्मिक विभाजन करण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप केला. पश्चिम बंगालमध्ये मुस्लीम लोकसंख्या वाढली आहे असं नरेंद्र मोदी प्रचार सभेत म्हणाले. धार्मिक विभाजनाची भाषा करणे देशाच्या पंतप्रधानाला शोभत नाही. यातून जगात काय संदेश जातो, असा सवाल रमेश चेन्नीथला यांनी उपस्थित केला आहे. १० वर्षात



सरकारने काय काम केलं त्यावर नरेंद्र मोदी बोलत नाहीत. जनता मोदी सरकारच्या कारभाराला कंटाळली असून देशभर भाजपाविरोधी लाट आहे. लोकसभा निववडणुकीत भाजपाचा दारूण पराभव होत असून इंडिया आघाडीचे सरकार येणार असल्याचा विश्वास चेन्नीथला यांनी व्यक्त केला.

पीएम मोदींच्या दौऱ्यात काँग्रेस काळे झेंडे दाखवणार

दरम्यान, या पत्रकार परिषदेत बोलताना भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्ष अलका लांबा यांनी भाजप आणि पीएम मोदी यांच्यावर जोरदार टीका केली. भाजपाचा मित्र पक्ष जेडीएसचा लोकसभा उमेदवार प्रज्वल रेवन्ना याने शेकडो महिलांना ब्लॅकमेल करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केले आहेत. याच प्रज्वल रेवन्नांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मते मागितली

## १७ मेला मुंबईत इंडिया आघाडीची सभा

लोकसभा प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात मुंबईतील बीकेसी मैदानावर १७ मे रोजी इंडिया आघाडीची जाहीर सभा होणार आहे. या सभेला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल उपस्थित राहणार आहेत. तसंच १८ मे रोजी इंडिया आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद होणार असल्याची माहिती रमेश चेन्नीथला यांनी दिली आहे.

# मतदारांच्या नावाने बोगस व्यक्तीकडून मतदान, शिरुरमध्ये धक्कादायक प्रकार

सध्या राज्यासह देशात निवडणुका सुरु आहेत. प्रत्येक मतदार मतदान केंद्रात जाऊन आपल्या आवडत्या नेत्याला, पक्षाला मत देतोय. तुम्ही मतदान करायला गेलात, मतदान केंद्राच्या यादीत तुमचे नाव पाहताय आणि तुमच्या नावाचे मतदान आधीच झालंय, असं तुम्हाला कळालं तर? धक्का बसेल ना? असाच प्रकार पुण्यात राजगुरुनगर येथे झाला. शिरुर लोकसभा मतदारसंघातील राजगुरुनगर शहरात बोगस मतदान होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आलाय..मतदारांच्या नावाने बोगस व्यक्तीने मतदान करुन



स्वाक्षरी केल्याचा प्रकार घडलाय. प्रत्यक्ष मतदान करण्यासाठी गेलेल्या मतदाराने बोगस मतदान होत असल्याचा प्रकार उघड केला आहे.राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु विद्यालयातील मतदान केंद्रात धक्कादायक प्रकार घडला. मतदान केंद्रात बोगस मतदानामुळे गोंधळ उडाला. त्यामुळे अमोल कोल्हेंच्या प्रतिनिधींनी केंद्र प्रमुखांना जाब विचारला. बोगस मतदान होत असल्याचा प्रकार समोर आल्याने प्रशासन, निवडणूक आयोगाच्या कारभारावर पुन्हा एकदा शंका उपस्थित होतेय.

# शांताबाई सोपान डापकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील संगम येथील रहिवासी असलेल्या शांताबाई सोपान डापकर यांचे दि.१२ मे २०२४ रविवारी रात्री ११.२० दरम्यान ७७ व्या वर्षी हृदविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले.शांताबाई डापकर ह्या दिंद्रुड सोसायटीचे व्हा.चेअरमन मधुकर डापकर यांच्या मातोश्री होत्या,त्या अत्यंत मनमिळावू ,शांत ,स्वभावाच्या होत्या, त्यांच्या असे अचानक जाण्याने



गावात व आजूबाजूच्या परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात नवनाथ सोपानराव डापकर,मधुकर सोपान डापकर,परमेश्वर सोपानराव डापकर,हे तीन मुले,तीन मुली,सुना, जावई, नातवंडे, पत्रउंड असा त्यांचा मोठा परिवार आहे,.शांताबाई डापकर ह्या दै.अक्षर वार्ता चे संपादक संजय हंगे यांच्या सासूबाई होत्या.



बीड - लोकसभा मतदारसंघात वृद्धांनी उत्स्फूर्तपणे मतदानात सहभाग नोंदविला. काही प्रतिनिधी छायाचित्रे.

# बीड लोकसभा मतदारसंघात सुमारे ७२ % टक्के विक्रमी मतदान

बीड /प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदार मतदारसंघाच्या निवडणुकीकरीता मतदारसंघात सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वाजेपर्यंत प्राथमिक उपलब्ध आकडेवारीनुसार सुमारे

७२ % टक्के मतदारांनी मतदानाचा विक्रमी हक्क बजावला. मतदान प्रक्रिया अपवाद वगळता शांततेत पार पडली.

या यामध्ये सर्वाधिक परळी ८० % आणि आष्टी ७५ %, तर बीड ६२ %, गेवराई ६५ %, केज ६८ %., माजलगाव ६८ %, विधानसभा मतदार संघात मतदान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मतदानासाठी सकाळपासूनच मतदारांमध्ये उत्साह दिसत होता.

अनेक मतदान केंद्रावर सहा पर्यंत आलेल्या शेकडो मतदारांनी रात्री दहा वाजेपर्यंत थांबून मतदानाचा हक्क बजावला असल्याचे समजते.

## २६ बुथवर मतदान मशीन बदलण्यात आले

मतदानाच्या सुरुवातीला २६ बुथवरचे मशीन बदलण्यात आले. ८ कंट्रोल युनिटमध्ये तांत्रिक

अडचणीमुळे बदलण्यात आले. १८ व्हीव्हीपॅट ही बदलण्यात आले.

## कसे आणि कुठे होते मतदान केंद्र ?

बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये १५ आदर्श मतदान केंद्र होते. यामध्ये गेवराई २, माजलगाव -२, बीड -२,आष्टी -५, केज -४ व परळी -१ हे होते.दिव्यांग, महिला, नव मतदार, तृतीयपंथी सर्वांनी उत्साहपूर्णपणे मतदान प्रक्रियेत भाग घेऊन मतदानाचा हक्क बजावला. बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये ११ दिव्यांग मतदान केंद्र होते, ५५ महिला मतदान केंद्र, ३१६ परदानशी केंद्र होती.




बीड - सपना या तृतीयपंथीने पेठ बीड वरील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला.

### लिंबागणेश येथील फेव्हीस्टीक प्रकरणामुळे संवेदनशील मतदान केंद्राचा आयजी

# विरेंद्र मिश्रा,एसपी नंदकुमार ठाकूर यांच्याकडून आढावा

लिंबागणेश:- आज दि.१३ सोमवार रोजी लोकसभा निवडणुक मतदानाच्या पार्श्वभूमीवर लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील मतदान केंद्राचा पोलिस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी विशेष महानिरीक्षक परीक्षेत्र छत्रपती संभाजीनगर विरेंद्र मिश्रा, पोलिस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकूर,अपर पोलीस अधीक्षक बीड सचिन पांडकर , अपर पोलीस अधिक्षक अंबेजोगाई चेतना तिडके

यांनी आढावा घेतला. यावेळी नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी व ईतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.राखीव दलाचे तैनातीत होते.केंद्र अध्यक्ष लिंबागणेश ३४१ सुभाष भोसले ७६८ व केंद्र अध्यक्ष ३४२ क्षीरसागर जगदीश ७८१ यांनी एकुण २५१४ मतदानापैकी १५४९ असे ६० टक्के मतदान झाले. राखीव सुरक्षादलाचे १ अधिकारी १६ जवान तैनात होते.मतदान शांततेत व सुरळीत पार पडले.



बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी घेण्यात आलेल्या ग्रामपंचायत निवडणुक दरम्यान प्रभाग क्रमांक २ मधील सरपंच पदाचे दावेदार असणा-या अँड.गणेश वाणी यांच्या शिट्टी चिन्ह असलेल्या बटणावर मशिनमध्ये फेव्हिस्टीक टाकल्याचा प्रकार घडुन आला आला होता. संबंधित प्रकरणी केंद्र प्रमुखांच्या फिर्यादीवरून नेकनुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### मतदान केंद्रावर पाळणाघर , हिरकणी कक्ष

बीड लोकसभेच्या निवडणुकीत महिलांचा मताचा टक्का वाढावा यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी बीड दिपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात विविध उपक्रम राबविण्यात आले त्यातच महिलांचा मताचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभाग व बालकल्याण विभाग एकात्मिक बालविकास सेवा योजना विभागाने मतदान केंद्रावर पाळणाघरे व हिरकणी कक्ष करण्याचे नियोजन केले होते.त्याअनुषंगाने अंगणवाडी सेविका बबिता निर्मळ, आबदार यांनी मतदान केंद्रावर पाळणाघर व हिरकणी कक्ष सजावट करून सज्ज केलेला असुन लहान बालके असणा-या महिलांना मतदान करून येईपर्यंत आपल्या बालकांना या पाळणाघरात ठेवता येणार आहे त्यामुळे महिला उत्स्फूर्तपणे मतदानास येतील व मतदानाचा टक्का वाढणार आहे.



बीड - बीड शहरातील गणेश विद्या मंदिर , शिवाजी नगर येथे शिवसंग्राम राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी मतदानाचा हक्क बजावला. या वेळी त्यांनी आपण सद सद विवेक बुद्धीला अनुसरून आणि लोकनेते विनायकराव मेटे यांना अभिवादन करून मतदानाचा हक्क बजावला असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.



बीड - तालुक्यातील पाली येथे मतदानाचा हक्क बजावताना आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा तथा पत्रकार शेख आयेशा यांच्यासह जागरूक मतदार आणि प्रशासकीय अधिकारी.

# कुठे रिमझिम तर कुठे धो-धो

## महाराष्ट्रभरात अवकाळी पावसाचं थैमान

**आज महाराष्ट्रभरात पाऊस कोसळला. अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. महाराष्ट्राच्या अनेक भागात अचानकपणे आलेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली. कोणत्या भागात पाऊस पडला? तर कुठे पावसामुळे नुकसान झालं?**

**आज सकाळपासूनच कडाक्याचं ऊन होतं. चौथ्या टप्प्यातील मतदानही पार पडलं. या मतदान प्रक्रियेवरही उन्हाचा परिणाम झाल्याचं बोलण्यात येतंय. सकाळपासूनच नागरिकांना उन्हाच्या झळा सोसाव्या लागत होत्या. अशात दुपारनंतर मात्र वातावरण बदललं अन् महाराष्ट्रभरात अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. मोसमातील पहिला पाऊस असल्याने लोकांमध्ये आनंदाचं वातावरण होतं खरं पण याच अवकाळी पावसाने मात्र मोठं नुकसान केलं आहे. मुंबईत काही ठिकाणी पडझडीच्या घटना घडल्या आहेत. एका जागेवर होर्डिंग कोसळलं. तर कुठे झाड कोसळल्याचं समोर आलंय.**

उकाड्यामुळे नागरिक त्रस्त असतानाच अचानकपणे पावसाच्या सरी आल्या. त्यामुळे मुंबईकरांना दिलासा जरी मिळाला असला तरी या पावसाने नुकसानही केलं आहे. अचानक आलेला अवकाळी पावसाचा फटका हार्बर रेल्वे मार्गावर देखील झाला आहे. लोकल १५ ते २० मिनिटे उशिराने धावत आहेत. त्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वाशी रेल्वे स्थानकात प्रवाशांची गर्दी पाहायला मिळतेय.

अवकाळी पावसाने पडझडीच्या घटना

जोगेश्वरीत नारळाचं झाड कोसळलं. मेघवाडी नाका इथं नारळाचं झाड कोसळलं आहे. वादळी वाऱ्यामुळे नारळाचं झाड कोसळलं आहे. घाटकोपरच्या छेडा नगरजवळ मोठं होर्डींग पेट्रोल पंपावर कोसळलं. जवळपास शंभर जण अडकल्याची शक्यता आहे. ३५ जखमीना राजावाडी रूग्णालयात करण्यात दाखल आलं आहे. अग्निशामक दल, पोलीस प्रशासन आणि ॲम्ब्युलन्स घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. दुपारी ४.३० दरम्यान घटना घडल्याची माहिती आहे.



छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही पावसाचा फटका बसला आहे. वाळूज आणि दौलताबाद परिसरात अवकाळी पाऊस पडला. साडेपाच वाजल्यापासून पावसाला सुरुवात झाली. तर संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ढगाळ वातावरण आहे.रत्नागिरीतील लांज्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. चिपळूण , गुहागर पाठोपाठ आता लांज्यात पावसान हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसानं बाजारपेठेत व्यापारी आणि ग्राहकांची तारांबळ उडाली. उकाड्याने हैरान झालेल्या रत्नागिरीकरांना काहीसा गारवा मिळालाय.

सातार्‍यात पावसाची हजेरी

सातारा जिल्ह्यात मागील तीन दिवसापासून अवकाळी पाऊस पडत आहे. कोरेगाव शहरातही आज अवकाळी पावसामुळे कोरेगाव रेल्वे स्टेशन नजीक वडाचे झाड पडलं. त्यामुळे सातार्‍याहून कोरेगावकडे आणि कोरेगावहून साताराकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली. यामध्ये सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी वाहनांची भली मोठी रांग या रस्त्यावर लागलेली पाहायला मिळालं. तब्बल दोन तासाहून अधिक या ठिकाणी वाहतूक विस्कळीत झालेली पाहायला मिळाली.

### होर्डिंग म्हणजे काय?

एखाद्या प्रोडक्टची जाहिरात करण्यासाठी रस्त्याच्या कडेला मोठमोठे होर्डिंग्ज लावले जातात. हे होर्डिंग्ज उंच असतात. रस्त्यावरून प्रवास करणाऱ्यांपर्यंत आपलं उत्पादन पोहोचण्यासाठी होर्डिंग्ज वापरले जातात. आता निवडणूक काळात प्रचारासाठीही होर्डिंगचा वापर केला जातो.

### शेतीला फटका बसण्याची शक्यता

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यात अचानक अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. अवकाळी पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र फळबाग शेतीला याच्या मोठा फटका बसणार आहे. तसेच मतदानाच्या शेवटच्या टप्प्यात आलेल्या पावसामुळे मतदानाच्या टक्केवारीवर देखील याच्या परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# लोकशाहीचा उत्सव साजरा होत असतानाच पिंपरनई गावावर शोककळा

## विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने विवाहितेचा मृत्यू:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी


बीड तालुक्यातील पिंपरनई येथे काल दि.१३ सोमवार रोजी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर मतदान सुरू असतानाच दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास यमुना अनिल आमटे वय ३३ वर्षे या विवाहितेचा घरात विद्युत प्रवाह उतरल्याने विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू झाला आहे. एकीकडे गावात लोकशाहीचा उत्सव साजरा करत असतानाच घडलेल्या दुर्दैवी घटनेने गावावर शोककळा पसरली असुन घटनेनंतर मतदान केंद्रावर शुकशुकाट होता.गरीब ऊसतोड मजुरांच्या कुटुंबातील व्यक्तींचा मृत्यू झाल्याने परीसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. यमुना आमटे यांना पृथ्वीराज व प्राची नावाची १२ वर्षे वयाची जुळी मुले आहेत.आनिल ऊसतोडणीसाठी बाहेर गावी गेल्यानंतर ही घटना



घडली.यमुनाबाई यांच्या आई शकुंतला लक्ष्मण वायभट या शेतातुन दुपारी घरी आल्यानंतर त्यांना यमुनाबाई बेशुद्ध पडलेल्या दिसल्या.हात लाऊन उठवण्याचा प्रयत्न केला असता त्यांना करंट बसल्यानंतर त्यांनी आरडाओरड केल्यानंतर शेजारी जमा झाले.वायर तोंडुन त्यांना बीड येथील रूग्णालयात नेण्यात आले परंतु त्यापुर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले.पिंपरनई गावात एकुण ९३७ मतदान असुन काल दुपारी ३ वाजेपर्यंत ७१३ मतदान केल्याची नोंद होती.दुपारी ३ वाजता एकच आरडाओरडा झाल्याने यमुना आमटे यांना घेऊन बीड येथील रूग्णालयात नेण्यात आले परंतु तोपर्यंत मृत्यू झाला होता. दुर्दैवी घटनेनंतर मतदान केंद्राकडे कोणीही फिरकले नाही.घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असु आज तालुकास्तरीय अधिकारी पिंपरनई येथे घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करणार आहेत व महावितरण कडुन सर्वोतोपरी मदत करण्यात येईल.असे आश्वासन लिंबागणेश येथील महावितरणचे उपअभियंता हुलकुडे यांनी दिले आहे.

यमुना आमटे या ऊसतोड मजुर असुन त्यांच्या नावावर २ एकर कोरडवाहू शेती असुन गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतुन शेतकऱ्यांच्या अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांस २ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य दिलं जाते त्या योजनेअंतर्गत यमुनाबाई यांच्या लहान जुळ्या मुलांच्या भवितव्यासाठी आर्थिक सहाय्य करण्यात यावे.अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार.

# पत्रकार जावेद शेख यांच्या भाच्याचा विवाह सोहळा आष्टी येथे थाटात संपन्न



पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा येथील पत्रकार जावेद शेख यांचा भाचा समीर मुस्तफा शेख याचा व आष्टी (चिखली) येथील अजिम हमीद शेख यांच्या कन्येचा विवाह सोहळा दि.१२ मे रविवार रोजी आष्टी येथील लक्ष्मी लॉन्स येथे मोठ्या थाटात संपन्न झाला.यावेळी मा.आ.दरेकर नाना,मा.जि.प.अध्यक्ष डॉ. शिवाजी राऊत,युवा नेते सतिष आबा शिंदे,भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जेष्ठ नेते कॉ. महादेव नागरगोजे,शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई विष्णुपंत घोलप,हाजी अब्दुलहाई सौदागर, पत्रकार विजय जाधव,संजय सानप प्रा.जावेद पठाण हमीदखान पठाण,प्रा.फय्याज शेख,श्रीकांत बुधवंत,इलियास फिटर, किसान सेलचे इलियास भाई दासखेडकर,शेख तौसिफ,दिलीप भाऊ जाधव,सय्यद असलम,शेख रहीम भाई,शेख मसरूद्दिन, बाबुराव मुळे,सय्यद फेरोज,सय्यद आसिफ,यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, विविध क्षेत्रातील मान्यवर नातेवाईक, मित्रपरिवार, हितचिंतक आदींनी उपस्थित राहून नवदाम्पत्याना भरभरून शुभेच्छा दिल्या. यावेळी बहारदार सुत्रसंचालन हमीदखान पठाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार पत्रकार जावेद शेख यांनी मानले.

# नांदेवाली येथे अखंड हरीनाम सप्ताह सुरू

तिंतरवणी ।प्रतिनिधी

किशोर श्रिधर थिटे. :- नांदेवाली येथे स्वामी निगमानंद महाराज ( मच्छिंद्रगड) यांच्याजन्मभूमी असलेल्या नांदेवाली येथे जन्मोत्सवानिमित्त वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण सोहळा महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली भव्य दिव्य स्वरूपात संपन्न होत आहे त्यानिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे त्याम ध्ये काकडा भजन, ग्राम प्रदक्षिणा,ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम महाराज गाथा भजन, भावार्थ रामायण, गीत रामायण, ज्ञानेश्वरी प्रवचन,हरिपाठ, हरिकीर्तन, हारीजागर संपन्न होत आहे . संगीत रामायण प्रसिद्ध रामायणाचार्य लक्ष्मण महाराज शिरपे यांचे व भावार्थ रामायणाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहात प्रवचनकार सुरेश महाराज



थिटे, शिवाजीदादा शेळके, अण्णासाहेब महाराज थिटे, अर्जुन थिटे सर, सुदाम महाराज थिटे, तीर्थराज यांचे अमृतुल्य काल्याचे कीर्तन होणार महाराज पठाडे, दादासाहेब महाराज थिटे, यांचे प्रवचन होत आहे तर कीर्तनकार ह. भ. प बाबा गिरी महाराज नाकलवाडी, पांडुरंग महाराज गिरी, शिवानंद म हाराज शास्त्री १,उद्धव महाराज शास्त्री, ज्ञानेश्वर महाराज तांबे नेवासा, महेश महाराज मडके, रामेश्वर महाराज शास्त्री यांचे कीर्तन संपन्न होत आहे शुक्रवार १७ मे रोजी महंत स्वामी जनार्दन महाराज श्रीक्षेत्र संस्थान मच्छिंद्रगड आहे नंतर महाप्रसादाने सांगता होईल. महाप्रसादाचे आयोजन रमेश रामराव थिटे, सुदर्शन शामराव थिटे यांनी केले आहे या कार्यक्रमाचे भरदार सूत्रसंचालन दादासाहेब महाराज थिटे हे करत आहेत या सप्ताहाचा ला भाविक भक्ताने घ्यावा अशी आव्हान नांदेवाली ता. शिरूर कासार ग्रामस्थांनी केली आहे. स सप्ताहात नामांकित गायनाचार्य, मृदंगाचार्य, हार्मोनियम वादक उपस्थित राहात आहेत. नांदेवाली गावाला या स्वामी निगमानंद महाराज मच्छिंद्रगड यांच्या जन्मोत्सव सोहोळ्या ने पंढरपूर आवतारले आहे.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती विविध उपक्रम

## यशवंतराव चव्हाण चौक येथे साजरी करण्यात आली

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात दिनांक १४ मे २०२४ रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अंबाजोगाई शहरातील यशवंतराव चव्हाण चौक येथे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष निखिल भैया पडुळे व आयोजक धर्मवीर संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक भीमराव सरवदे साहेब राजेश भाऊ वाहुळे पप्पू भाऊ आपेट अकबर शेख अशोक भाऊ काळे बालाजी मुळे

आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रथम यशवंतराव चव्हाण चौक येथे धर्म वीर छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गाच्या पाठीला पुष्पहार अर्पण करून जयंती साठी



उपस्थित असलेल्या सर्वांसाठी अल्प उपहाराचा व चहापाण्याचा कार्यक्रम घेण्यात आला तसेच या कार्यक्रमांमध्ये अनेक जणांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याला उजाळा दिला यावेळी सर्वांना माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब यांनी मार्गदर्शन केले यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून नगरसेवक संतोष दादा शिनगारे महादेव अण्णा आदमाने संजय भैय्या गंभीरे संकेत भैया मोदी महेश भैय्या कदम बाळासाहेब शेप (प्रिंस) अशोक हेडे श्रीकांत कदम भैय्या परदेशी बाबा भिसे प्रकाश सर बोरगावकर नाना देवकर कृष्णा सुनील काका लोमटे बाबा मांदळी मोहम्मद ताहेर भाई वजीर शेक सुनील जगताप दुषांत भैय्या लोमटे दिग्विजय लोमटे परमेश्वर देवकर अमित भैया जाजू दयानंद भाऊ कांबळे दीपक भाऊ कांबळे कैलास भैया पाटोळे अशोक भाऊ गंडले बाळासाहेब धायगुडे अतुल कसबे सुधाकरजी जोगदंड तसेच या कार्यक्रमाला यशस्वी होण्यासाठी समितीचे आदित्य भैया चौरे रोहन पवार ओम सूर्यवंशी आदर्श चौरे आदित्य गिरी शिवराम शेळके शिवानंद पाचपिंडे या सर्वांनी परिश्रम घेतले

# गेवराई विधानसभा मतदारसंघात ६५ टक्के मतदान

## किरकोळ वाद-विवाद वगळता, पोलीस बंदोबस्तात शांततेत मतदान पार पडले

**गेवराई । प्रतिनिधी**

**संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या बीड लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवार दि.१३ मे रोजी गेवराई विधानसभा मतदारसंघात ६५ टक्के मतदान झाले असून किरकोळ अपवाद वगळता इतर सर्व ठिकाणी मतदारांनी शांततेत मतदानाचा हक्क बजावला आहे. सकाळपासून मतदारांनी रांगेत उभे राहून मतदान केले. मतदारांनी उत्साह दाखविला असून मतदानाची टक्केवारी वाढण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मतदानाचा वाढलेला टक्का कुणाला धक्का? याविषयी दोन्ही गटाकडून**



**आकडेमोड केली जात आहे. दरम्यान जबरदस्त निवडणूक यंत्रणा आणि चोख पोलीस बंदोबस्तात मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया निर्विघ्न पार पाडण्यात निवडणूक विभागाला यश आले आहे.**

गेवराई मतदार संघात सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. आभाळ भरून आल्याने वातावरण उष्णता होती. मात्र कडक ऊन नव्हते. त्यामुळे नागरिकांनी सकाळीच घराबाहेर पडून मतदानाचा हक्क बजावला. मतदान केंद्रावर सकाळपासून मतदारांच्या रांगा पाहायला मिळाल्या. गेवराई शहरात सार्वधिक मतदान झाल्याचा अंदाज आहे. गेवराई मतदारसंघात १ लाख ९३ हजार ४५ पुरुष मतदार, १ लाख ७१ हजार ७६८ महिला मतदार व दहा तृतीय पंथी मतदार असून एकूण ३ लाख ६४ हजार ८२३ मतदारांपैकी ६५ टक्के मतदारांनी उमेदवाराचे भवितव्य मतपेटीत बंद करून मतदानाचा हक्क बजावला आहे.

गेवराई मतदारसंघात ३९७ मतदान केंद्र, २ हजार ६६६ अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ३ लाख ६४ हजार ८२३ मतदानापैकी पाच वाजेपर्यंत ६३ टक्के मतदान झाले होते. ३ हजार ४६४ नवीन मतदारांना पहिल्यांदाच मतदानाचा अधिकार मिळाल्याने टक्केवारी वाढण्याची शक्यता आहे.गेवराई विधानसभा मतदारसंघात रामनाईक तांडा, हरिलाल नाईक तांडा, वडगाव गुंधा, अशी तीन संवेदनशील केंद्रे होती. पिंक महिला केंद्र पाच व दिव्यांग केंद्र उभारण्यात आले होते



बीड : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अंबाजोगाई येथे आले असता त्यांचे स्वागत करताना आ.नमिताताई मुंदडा, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर.

बीड : शहरातील पोलीस मुख्यालयाजवळील बुथवर माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह कुटुंबियांनी लोकसभा निवडणुकीचा मतदान हक्क बजावला.

# गेवराई शहरात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

# भव्य शोभा यात्रेने गेवराई शहर दुमदुमून गेले

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती निमित्त वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने भव्य शोभायात्रे चे आयोजन करण्यात आले होते. सकाळी आठ वाजता गेवराई शहरातील मेनरोड येथील रेणुका देवी मंदिरातून ही भव्य शोभा यात्रा काढण्यात आली. यावेळी महिलांनी एकाच रंगाच्या साडया परिधान करून तर पुरुषांनी पांढऱ्या रंगाचा वेष परिधान करून या शोभयात्रेत सहभागी झाले होते.या शोभा यात्रेमध्ये पुढे बँड पथक होते त्या मागे अतिशय शिस्ती मध्ये वीरशैव महिला भजन करत होत्या तर मागे सजवलेल्या रथमध्ये महात्मा बसवेश्वरांचा आकर्षक असा पूर्णाकृती पुतळा होता तर

या शोभयात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे महात्मा बसवेश्वरांच्या वेशभूषेत आश्वारूढ असलेल्या सर्वेश सचिन राजुरे यांने सर्वांचे लक्ष वेधले होते यावेळी महिलांनी बसवनामाचा गजर करत पाऊली खेळत तसेच फुगडी खेळत या शोभा यात्रेची शोभा वाढवली.या शोभा यात्रेत बाल गोपालां सह वयोवृद्ध महिलांना देखील फुगडी खेळण्याचा मोह आवरला नाही.मेन रोड तहसील रोड मार्गे शोभा यात्रा शास्त्री चौकात आल्यावर शिवतीर्थ शोरूम च्या वतीने सर्व समाज बांधवाना सरबत देण्यात आले. त्यानंतर लाल बहादूर शात्री यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून माळी गल्ली,मोमीनपुरा, मार्गे रेणुका देवी च्या मंदिरात या शोभा यात्रेचा समारोप करण्यात आला. या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबीर देखील घेण्यात आले या रक्तदान शिबिरामध्ये



४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी वीरशैव लिंगायत समाजातील महिला पुरुषांना अल्पोहार देण्यात आला. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.यावेळी ऐश्वर्या सदाशिव अप्पा शेटे, श्रद्धा कल्याण स्वामी यांच्या मुली डॉक्टर झाल्या बद्दल सन्मान करण्यात आला. तर प्रतिष्ठित व्यापारी दीपक कापसे यांच्या कन्या स्नेहा व आरती कापसे यांनी उत्कृष्ट प्रकारे रांगोळी काढून जिल्ह्यात वीरशैव समाजाचे व आपल्या पालकांचे नाव लौकिक केले त्याबद्दल जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्या हस्ते नुकताच स्नेहा कापसे सत्कार करण्यात आला होता. तिच्या या कलेबद्दल त्यांच्या पालकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी युवा नेते शाम रुकर,सुधाकर संभाहारे,वैजिनाथ अप्पा मिटकर,रामेश्वर लांडगे,गणेश अप्पा कापसे,लक्ष्मण अप्पा रुकर,वैजिनाथ रुकर, सुरेश संभाहारे, पांडुरंग आप्पा हादगुले, शंकर आप्पा परळकर,रवींद्र रुकर,योगेश कापसे,सुरेंद्र रुकर,दिपक कापसे,गणेश मिटकर, सुनील संभाहारे, प्रवीण राजुरे, नंदकिशोर कापसे,उमेश राजूरकर, गणेश रुकर, संतोष सोसे, राजेंद्र फुलशंकर,दिपक कापसे,अक्षय शेटे, शंकर संभाहारे, सचिन राजुरे, ज्ञानेश्वर फुलशंकर, महेश सोसे,आदी उपस्थित होते. तर हा सर्व शोभा यात्रेचा व जयंतीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महात्मा बसेश्वर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अजय रुकर,संदीप कापसे, गजानन कापसे, अनिकेत संभाहारे,यांनी केले होते,अमोल फुलशंकर, अमोल संभाहरे, विशाल कापसे, रोहित फुलशंकर,संदीप रुकर,गजानन संभाहारे, दत्ता टोणपे, दिनेश संभाहारे, रोहन सोसे,आदींनी परिश्रम घेतले. हा महात्मा बसेश्वर जयंती उत्सव व शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. यावेळी वीरशैव लिंगायत समाजातील सर्व महिला पुरुष बालगोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT